<u>**नियमित दिवाणी दावा क्रमांक ६७/२०२१ मधील अर्ज**</u>
<u>**(निशाणी क्रमांक २६) वरील आदेश**</u>
**(सीएनआर क्र.एमएचएएच०८-०००११४-२०२१)**

०१. प्रस्तुत अर्ज वादीने प्रमाणित नकाला हजर करण्याचा प्रतिवादी क्र. ६ विरुध्द आदेश व्हावा म्हणून दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ६ ने सदर अर्जास निशाणी ३५ नुसार म्हणणे दाखल करुन विरोध केलेला आहे.

०२. वादी व प्रतिवादींतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला प्रस्तुत दावा जाहिर ठराव व निरंतरचा मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. मौजे साकुरची हिरेवाडी शिवारातील संगमनेर तालुक्यातील गट नं. ५१९ पैकी पुर्वेकडील ४३ आर आधिक ०.०५ खराबा हि दावा मिळकत आहे. त्यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. १ यांनी उसाचे पिक केले होते. प्रतिवादी क्र. १ ने वादींचा हक्क डावलून गट नं. ५१९ मधील ७० आर आधिक ०.०५ खराबा या क्षेत्रामधील उसाचे पिक परस्पर स्वत:च्या नावाने पाठविले असल्याचे वादीचे म्हणणे आहे. सबब, गट नं. ५१९ मधील किती उस गळतीसाठी आला त्याचे वजन किती भरले व पैसे कोणास दिले याबाबत प्रमाणित नकला हजर करण्याचा आदेश प्रतिवादी क्र. ६ यांना देण्याची विनंती वादीने केलेली आहे.

०३. प्रतिवादी क्र. ६ यांनी आपल्या म्हणण्यामध्ये असे नमूद केले आहे की, नियमाप्रमाणे प्रतिवादी क्र. १ च्या मालकी क्षेत्रातील उसतोड करण्यात आली. प्रतिवादी क्र. १ ने ३० आर पेक्षा जास्त क्षेत्राची नोंद दिलेली नव्हती. त्याचे वजन, रक्कम वगैरे बाबी प्रतिवादी क्र. ६ यांनी नमूद केलेले आहेत. तसेच निशाणी ३४ सोबत उस खरेदीच्या कराराची प्रत <u>७/१२</u> उता-याची प्रत पैसे दिल्याबाबत पावती दाखल केलेली आहे. त्यामुळे अर्जातील विनंतीनुसार पुर्तता झाली असल्याचे दिसते. इतर कागदपत्रांची आवश्यकता असल्यास वादी ते दाखल करु शकतात त्यामुळे विनंतीप्रमाणे आदेश करण्याची आवश्यकता नाही. सबब, अर्ज नामंजुर करण्यात येत आहे.

MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Digitally signed by MANSOOR MAHAMOOD SHAIKH
Date: 2022.10.10 16:54:12 +0530

ठिकाण :- संगमनेर.
दिनांक :- १०.१०.२०२२.

(एम. एम. शेख)
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर
संगमनेर.